मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

दैनिक

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचो न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ३३२ वा • मंगळवार, ता. १७ जून २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

# मोदींना सायप्रसचा दुसऱ्या सर्वोच्च दर्जाचा नागरी सन्मान

## ब्रिटनमध्ये कार्यरत, सायप्रियन प्रजनन डॉक्टर Professor Kypros Nicolaides यांना पुर्वी मिळाला

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना सायप्रस सरकारने त्यांच्या देशाच्या द्वितीय नागरी सन्मानाने 'ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मकारियोस' गौरवले आहे. सायप्रसचे राष्ट्रपती निकोस क्रिस्टोडौलिडेस यांनी हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान केला. यापुर्वी सायप्रसचा यापेक्षा सर्वोच्च असलेला Grand Collar पुरस्कार प्रणब मुखर्जी, नेपाळचे किंग बिरेंद्र यांना मिळाला होता. यावेळी मोदी म्हणाले, द ग्रँड क्रॉस ऑफ द ऑर्डर ऑफ मॅकॅरिओस प्रदान केल्याबद्दल मी सायप्रस सरकार आणि तेथील जनतेचे मनापासून आभार मानतो. हा माझा सन्मान नाही. हा १४० कोटी भारतीयांचा सन्मान आहे. मी हा पुरस्कार भारत आणि सायप्रसमधील शाश्वत मैत्रीला समर्पित करतो. एकत्रितपणे, आपले राष्ट्र एक चांगले ग्रह निर्माण करण्यासाठी योगदान देतील. हा सन्मान भारताच्या प्राचीन संस्कृतीचा, लोकशाही मूल्यांचा आणि जागतिक पातळीवरील



प्रभावी नेतृत्वाचा सन्मान मानला जात आहे. प्रधानमंत्री मोदी यांनी जागतिक स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना नेतृत्व, दृष्टिकोन आणि राष्ट्रनिष्ठा यांचे उत्कृष्ट उदाहरण जगासमोर ठेवले आहे. त्यामुळेच भारताचा आवाज आंतरराष्ट्रीय मंचावर अधिक प्रभावीपणे पोहोचतो आहे. या सन्मानामुळे संपूर्ण देशातील रा.स्व. संघ व भाजपाच्या कार्यकर्त्यांमधे आनंदाचे व अभिमानाचे वातावरण असून, हा प्रत्येक कार्यकर्त्यासाठी गौरवाचा क्षण आहे.

**काय आहे Order of Makarios III हा सन्मान?** सायप्रसचा सर्वोच्च नागरी सन्मान of Makarios III हा १९९१ साली स्थापन झाला आणि देशाचे पहिले राष्ट्राध्यक्ष आर्चबिशप मकारिओस यांच्या नावावरून ठेवण्यात आला. यामध्ये सहा श्रेण्या आहेत. Grand Collar, Grand Cross, Grand Commander, Commander, Officer, Knight

**Grand Crus श्रेणी म्हणजे काय?**

Grand Cross हा सुमारे दुसऱ्या सर्वोच्च दर्जाचे सन्मान आहे आणि प्रमुख राज्ये आणि व्यक्तींना, सामान्यतः विदेशी राष्ट्रप्रमुखांना, व्यवहारिक कार्य आणि सायप्रसबरोबरचे महत्त्वाचे योगदान मानून प्रदान केला जातो. **Grand Collar (सर्वोच्च) :** King Abdullah II जॉर्डन, King Birendra नेपाळ, Isaac Herzog इस्रायलचे राष्ट्राध्यक्ष Marcelo Rebelo de Sousa पोर्तुगालचे राष्ट्राध्यक्ष, Katerina Sakellaropoulou ग्रीसचे राष्ट्राध्यक्ष, Frank-Walter Steinmeier जर्मनीचे राष्ट्राध्यक्ष Sergio Mattarella इटलीचे राष्ट्राध्यक्ष, Pranab Mukherjee भारताचे माजी राष्ट्राध्यक्ष, Willem-Alexander नेदरलँड्सचे राजे **Grand Cross (मोदींना दिलेली श्रेणी):** Queen Máxima नेदरलँड्स, Narendra Modi भारताचे प्रधानमंत्री John Brademas अमेरिकन राजकारणी/शैक्षणिक Sergey Lavrov रशियाचे परराष्ट्र मंत्री (२०२० मध्ये प्रदान) Paul Sarbanes, अमेरिकन सीनेटर Bob Menendez अमेरिकन सीनेटर (२०२१) Nassir Abdulaziz Al-Nasser कतरचे राजदूत (Grand Commander स्तर), Professor Kypros Nicolaides), ब्रिटनमध्ये कार्यरत, सायप्रियन प्रजनन डॉक्टर. याव्यतिरिक्त, इतर राष्ट्राध्यक्ष, राजे, उच्च दर्जाचे राजकारणी-परराष्ट्रविषयक नेत्यांनाही दिले गेले आहेत. Order of Makarios III हा सन्मान फक्त व्यक्तीची वैयक्तिक कामगिरी नाही तर सायप्रस त्यांच्या देशाशी बांधिलकी, कुटुंबवाद आणि जागतिक संबंधात त्यांनी निभावलेल्या भूमिकेचा सन्मान म्हणून दिले जाते. प्रधानमंत्री मोदींना दिलेले Grand Cross हे त्यांच्या नेतृत्त्वाखाली जागतिक पातळीवर भारताच्या सशक्तपणाचे प्रतीक आहे, ज्याला सायप्रसने मोठा गौरव दिला आहे.

# देशी गोवंश संवर्धनासाठी पंकजा मुंडे यांचा पुढाकार

## गोवंश जतन आणि संवर्धन दिन' २२ जुलै साजरा होणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील देशी म्हणजेच गावरान गायींच्या जतन आणि संवर्धनासाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला असून, दरवर्षी २२ जुलै हा दिवस 'शुद्ध देशी गोवंश जतन आणि संवर्धन दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे.




राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या पुढाकारामुळे राज्य शासनाने यासंदर्भात अधिकृत अध्यादेश निर्गमित केला आहे. भारतीय कृषी संस्कृतीत गोवंशाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. देशी गायींचे दूध, शेण, गोमूत्र यांना केवळ आर्थिकच नव्हे तर औषधी आणि पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही अमूल्य मानले जाते. मात्र आधुनिक काळात देशी गोवंशाच्या संख्येत झपाट्याने घट होत असल्याचे चित्र आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन पशुसंवर्धन विभागाने जनजागृती आणि संरक्षणासाठी हा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या निर्णयामुळे शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायती, कृषी संस्था, स्वयंसेवी संघटना आदींना गोवंशाबाबत जनजागृती करणारे उपक्रम राबवण्यासाठी प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. गोसंवर्धनासाठी आवश्यक धोरणे आणि निधीही शासनाकडून पुढील काळात निश्चित करण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली. राज्य शासनाच्या या पावलाचे विविध क्षेत्रांतून स्वागत करण्यात येत असून, गोवंशाच्या संवर्धनासाठी हा टप्पा ऐतिहासिक ठरेल, अशी प्रतिक्रिया सामाजिक व कृषी कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

# पूल आहे... पण रस्ता नाही

## बेफिकिरीची आणि प्रशासकीय विकृतीची जाणीव ठेवावी- महेश झगडे

**नाशिक । प्रतिनिधी**

''हा विनोद समजावा की देशाच्या प्रशासनाचे दुर्दैव म्हणावे?'' असा संतप्त सवाल करत निवृत्त सनदी अधिकारी महेश झगडे यांनी इंद्रायणी नदीवरील एका अपूर्ण नियोजनाच्या पूलाचा फोटो सोशल मीडियावर शेअर करत, प्रशासनाच्या बेफिकिरीवर कठोर शब्दांत ताशेरे ओढले आहेत. हा पूल पूर्णपणे बांधलेला असूनही दोन्ही बाजूंना कुठलाही रस्ता नाही. दोन्ही टोकांना रस्ता न जोडलेला असतानाही सार्वजनिक बांधकाम विभागाने हा पूल बांधल्याचे धक्कादायक वास्तव खुद्द महेश झगडे यांनी त्यांच्या प्रत्यक्ष पाहणीतून मांडले. ''हा खर्च पूर्णपणे अनावश्यक होता. हाच निधी तिथे वापरला असता, जिथे पुलाची तातडीची गरज होती, तर त्याचा जनतेला फायदा झाला असता,'' असे झगडे यांनी स्पष्टपणे सांगितले. २०१६ साली पीएमआरडीए आयुक्त पदावर कार्यरत असताना त्यांनी पुणे परिसरातील रिंग रोडसाठी संपूर्ण ७४०० चौ. कि.मी. क्षेत्र स्वतः पायपीट करत पाहिले. त्याच दरम्यान, देहूपुढे इंद्रायणी नदीवरील हा विचित्र पूल त्यांच्या नजरेस पडला. संपूर्ण बांधलेला पूल, पण दोन्ही टोकांना रस्ताच नाही! या पार्श्वभूमीवर, कुंदमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून



फोटो सौजन्य : *Google Maps*
इंद्रायणी नदीवरील पूल. महेश झगडे यांच्या प्रत्यक्ष पाहणीतून

झालेल्या जीवितहानीचा संदर्भ देत झगडे म्हणाले की, ''अधिकाऱ्यांची कातडी किती बळकट झाली आहे, याची तीव्र जाणीव होते. अशा अधिकाऱ्यांनी तरी हा फोटो पाहून आपल्या प्रशासकीय विकृतीची जाणीव ठेवावी, ही किमान अपेक्षा आहे.'' नागरिकांचा विश्वास गमावणारी कामे या प्रकारामुळे केवळ सार्वजनिक निधीची नासाडीच झाली नाही, तर प्रशासनावरील लोकांचा विश्वासही ढासळतो आहे. नियोजनाच्या नावाखाली होणारे निर्णय किती विचारशून्य असतात याचे हे प्रत्यक्ष उदाहरण म्हणता येईल. रयत समाचारच्या वाचकांनो, या फोटोमागचे वास्तवावर तुमचे मत कळवा? प्रशासनाचे हे ''अधुरं नियोजन'' बदलण्यासाठी आपण आवाज उठवायला हवा का? आपले विचार आम्हाला ८८०५४०१८०० या व्हॉटसअप नंबरवर नक्की कळवा !



# मराठा महासंघ अध्यक्षपदी मालुसरे, महिलाध्यक्षपदी स्मिता साळवी

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

कै. अण्णासाहेब पाटील यांनी सन १९०० साली स्थापन केलेली अखिल भारतीय मराठा महासंघ ही संस्था आज १२५ वर्षांचा प्रेरणादायी प्रवास पूर्ण करत आहे. सामाजिक न्याय, समता आणि समाजोन्नतीचा ध्यास बाळगणाऱ्या या संघटनेच्या माध्यमातून कै. अण्णासाहेब पाटील व कै. शशिकांत पवार यांसारख्या नेतृत्वकर्त्यांनी आपले ज्वलंत विचार संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवले. सध्या या संस्थेच्या राष्ट्रीय नेतृत्वाची जबाबदारी अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, उपाध्यक्ष नरेंद्र पाटील, सरचिटणीस प्रकाश देशमुख आणि कोषाध्यक्ष प्रमोद जाधव यांच्या सक्षम मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पाडली जात आहे. मुंबई विभागात नवचैतन्याचा संचार १२ जून २०२५ रोजी, वसंतदादा पाटील इंजिनिअरिंग कॉलेज, चुनाभट्टी, मुंबई येथे सरचिटणीस प्रकाश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई विभागाची विशेष बैठक पार पडली. या बैठकीस मुंबई विभागातील आजी-माजी सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर बैठकीत पुढील नियुक्त्या एकमताने करण्यात आल्या: मुंबई विभाग अध्यक्ष : रुपेश मालुसरे, महिला अध्यक्ष : स्मिता साळवी, उपाध्यक्ष : अशोक देसाई, महेंद्र तावडे, संतोष साळवी, सुरज पाटील, सरचिटणीस : भालचंद्र दळवी, संदीप देसाई, भालचंद्र धुरी, कोषाध्यक्ष : प्रकाश म्हाब्दी, मुंबई संपर्कप्रमुख : सुभाष बामणे या निवडीमुळे मुंबई विभागात नव्या नेतृत्वाच्या माध्यमातून नवचैतन्य आणि विकासदृष्टीचा संचार होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. समाजहितासाठी सामूहिक ध्यास स्पष्ट कार्यदृष्टी नवनिर्वाचित अध्यक्ष रुपेश मालुसरे यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना सांगितले, ''राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे आणि सरचिटणीस प्रकाश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही दिलेल्या जबाबदारीची जाणीव ठेवून काम करू. मराठा समाजातील मागासवर्गीय तरुणांसाठी शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात प्रभावी उपक्रम राबवण्याचा निर्धार आहे.

# स्वामी संस्थेचा उपक्रम

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वितरण



**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

सोशल वर्कर्स असोसिएशन फॉर मेडिकल एज्युकेशन अँड एन्व्हायर्नमेंट (स्वामी), परळ या सेवाभावी संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी राबवली जाणारी विद्यार्थी सहाय्य योजना यंदाही उत्साहात पार पडली. या वर्षी सुमारे ३१० गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. सदर उपक्रम स्वामी संस्थेच्या कार्यालयाबाहेर पार पडला. या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. यतीन पटेल आणि सीए श्रीकांत कुलकर्णी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुरेश लाड (संस्थाध्यक्ष) होते. या प्रसंगी मोहन कटारे (कार्याध्यक्ष), वैशाली शिंदे (उपाध्यक्ष), उल्हास हरमळकर (खजिनदार), गोविंद राणे (सचिव), रचना खुळे, प्रतिभा सावंत, रश्मी नाईक, प्रतिभा सकपाळे, योगिनी लाड, सुमंगल गुरव, ममता खेडेकर, सुरेखा निमकर, विमल माळोदे, नम्रता पडवळ, लखबिर कौर आदी कार्यकर्ते उपस्थित होते. इयत्ता ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक डझन फुलस्केप वह्या, कंपास पेटी, परीक्षेचा पॅड, वर्कशीट, रंगपेटी, सर्टिफिकेट फोल्डर इत्यादी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थी सहाय्य योजना प्रकल्पप्रमुख गीता नाडकर्णी, नीलम सावंत, गायकर मॅडम, रीना महाडीक, अस्मिता घरत, स्वाती मयेकर यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या आयोजनात प्रदिप ढगे, अनिल तावडे, विलास पाटील, कांतीलाल परमार, शिवाजी गावकर, विष्णू मणियार, दिलीप मेस्त्री, अजय सुर्वे, शैलेश तुम्मा, दशरथ खमितकर, विश्वनाथ तेलकर यांचे मोलाचे योगदान लाभले.विद्यार्थ्यांच्या मनोगतामधून संस्थेच्या उपक्रमाची फलश्रुती स्पष्ट झाली.

# भारताच्या याजिक हिलांगची ऐतिहासिक कामगिरी

## दक्षिण आशियाई शरीरसौष्ठव स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई!

**भूतान । प्रतिनिधी**

भारताची याजिक हिलांग हिने भूतानमध्ये नुकत्याच पार पडलेल्या १५ व्या दक्षिण आशियाई शरीरसौष्ठव क्रीडा स्पर्धेत भारतासाठी सुवर्णपदक जिंकत इतिहास रचला आहे. भारतीय तिरंग्यात लपेटलेली आणि अश्रूंनी भारावलेली याजिकचा फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, जो तिच्या मेहनतीला आणि राष्ट्रप्रेमाला साजेसा आहे. या स्पर्धेत विविध दक्षिण आशियाई देशांतील नामवंत स्पर्धक सहभागी झाले होते. अत्यंत काटेच्या स्पर्धेत याजिक हिलांगने आपल्या उत्कृष्ट सादरीकरण, फिटनेस आणि जिद्दीतून निर्णायकांची मने जिंकली



आणि सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून सुवर्णपदक पटकावले.याजिक हिलांगची ही कामगिरी केवळ क्रीडा क्षेत्रातील नसून, भारतातील महिलांसाठी आणि शरीरसौष्ठव क्षेत्रातील नवोदितांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या या यशाबद्दल संपूर्ण देशभरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारताच्या क्रीडा यशामध्ये आणखी एक सुवर्णक्षणाची भर घालणाऱ्या याजिक हिलांगला रयत समाचार परिवाराकडून मनः पूर्वक शुभेच्छा! याजिक हिलांगची सविस्तर माहिती : जन्म- २० जानेवारी २०००, अरुणाचल प्रदेशचा कोरुंग-कुमे जिल्ह्यातील तरुण खेळाडू. शिक्षण- राजकीयशास्त्रात मास्टर डिग्री. करियर- फिटीनेस ट्रेनर आणि डान्स इन्स्ट्रक्टर म्हणूनही कार्यरत. उद्दिष्ट- पोलीस अधिकारी व्हायची महत्त्वाकांक्षा I want to become a police officer and also keep pursuing bodybuilding.

# सेंद्रिय शेतीच्या दिशेने पाऊल

## पोखर्डीत 'ऑरगॅनिक नगर' गटास बियाण्याचे वाटप

**पिंपळगाव माळवी । प्रतिनिधी**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानांतर्गत सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी अहमदनगर तालुक्यातील मौजे पोखर्डी येथील कराळे वस्तीवरील विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात ''ऑरगॅनिक नगर सेंद्रिय शेती गटास'' मुग बियाण्याचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम पीक प्रात्यक्षिक प्रकल्पांतर्गत राबवण्यात आला. कार्यक्रमात सुधाकर बोराळे (जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अहिल्यानगर), दत्तात्रय डमाळे (उपविभागीय कृषी अधिकारी), विकास पाटील (तालुका कृषी अधिकारी), माधवी घोरपडे (मंडळ कृषी अधिकारी, जेऊर) यांचे मार्गदर्शन लाभले. शेतकऱ्यांना सखोल



मार्गदर्शन उप कृषी अधिकारी सतीश गोसावी यांनी खरीप हंगाम, बीज प्रक्रिया, हुमणी आळी नियंत्रण, योग्य शेती साहित्याचा वापर, माती नमुना तपासणी व शेती यांत्रिकीकरणाच्या योजनांची सविस्तर माहिती दिली. त्यांनी शेतकऱ्यांना बीज प्रक्रिया करून रुंद वरंबा सरी यंत्राच्या माध्यमातून पेरणी करण्याचे आवाहन केले, जेणेकरून उत्पादन वाढीस लागेल व खर्चात बचत होईल. उत्स्फूर्त सहभाग आणि सकारात्मक निर्धार या कार्यक्रमाचे नियोजन सहाय्यक कृषी अधिकारी राजेंद्र कर्डिले आणि शेतकरी मित्र सुनील कराळे यांनी केले होते. पोखर्डीचे सरपंच अंतूशेठ वारुळे यांचेही विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात शेतकऱ्यांनी सेंद्रिय शेतीचा अंगीकार करण्याचा निर्धार व्यक्त केला आणि शाश्वत शेतीच्या दिशेने एक सकारात्मक पाऊल उचलले.

# लाड पागे समितीच्या शिफारशींची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

## ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी घेतली मनपाची झाडाझडती

### सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, मास्क आदी सुरक्षा साधने तात्काळ पुरविण्याचे निर्देश

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सफाई कामगारांच्या हक्कासाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या लाड पागे समितीच्या शिफारशींची अत्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी करावी. याअंतर्गत प्रलंबित असलेली प्रकरणे तातडीने निकाली काढून कामगारांच्या वारसांना शासकीय सेवेत सामावून घेण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य ॲड.गोरक्ष लोखंडे यांनी दिले. महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित बैठकीत ॲड. लोखंडे बोलत होते. बैठकीस महानगरपालिकेचे प्रशासक यशवंत डांगे, उपायुक्त डॉ.संतोष टेंगळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी सचिन धस, सहायक आयुक्त सपना वसवा, अशोक साबळे, निखिल फराटे, मेहेर लहारे, जल अभियंता



परिमल निकम, शहर अभियंता मनोज पारखे, पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता गणेश गाडलकर, अतिक्रमण विभाग प्रमुख आदित्य बल्लाळ, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, कामगार अधिकारी धनंजय शित्रे, प्रभाग अधिकारी राकेश कोतकर, श्याम गोडळकर, शहाजहान तडवी आदी उपस्थित होते. यावेळी लोखंडे म्हणाले, कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांना नियमानुसार वेतन व सवलती द्याव्यात, कामगारांना किमान वेतन मिळेल याची दक्षता घ्यावी. सफाई कर्मचाऱ्यांना हातमोजे, मास्क आदी सुरक्षा साधने तात्काळ पुरविण्यात यावेत. कर्मचाऱ्यांची नियमित आरोग्य तपासणी करण्यात यावी. रमाई आवास योजनेंतर्गत लाभार्थ्यांना वेळेत लाभ देण्यात यावा. शहरातील झोपडपट्टी भागात आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा पुरविण्याच्या सूचनाही ॲड.लोखंडे यांनी यावेळी दिल्या. दोन वारसांना नियुक्तीपत्राचे प्रदान

लाड पागे समितीच्या शिफारशीअंतर्गत दोन कर्मचाऱ्यांच्या वारसांना ॲड. गोरक्ष लोखंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचे प्रदान करण्यात आले. विनोद नेटके व सौरभ भोसले या वारसांना नियुक्तीपत्र प्रदान करत चांगले काम करा, असेही ॲड. लोखंडे म्हणाले. रमाई आवास योजना प्रकल्प व विविध विकासकामांची पाहणी रमाई आवास योजनेंतर्गत शहरातील प्रकल्पांना ॲड. गोरक्ष लोखंडे यांनी भेट देऊन पहाणी केली. तसेच यावेळी लाभार्थ्यांशी संवादही साधला. या प्रकल्पांना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या सुचनाही त्यांनी यावेळी दिल्या. तसेच रामवाडी, सिद्धार्थनगर भागाला प्रत्यक्ष भेट देऊन त्याठिकाणच्या विविध विकासकामांची पहाणीही त्यांनी यावेळी केली.



# रेल्वेस्टेशन मनपा शाळेत आरोग्यविषयक जनजागृती करत नवागतांचे स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगर महानगरपालिका शाळा क्रमांक ४, रेल्वे स्टेशन येथे नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभानिमित्त प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत मोठ्या उत्साहात पार पडले. समग्र शिक्षा अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शूज व शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमात नवागत विद्यार्थ्यांचे औक्षण करून गुलाब पुष्प व शालेय साहित्य देऊन स्वागत करण्यात आले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ''विद्यार्थ्यांनी मोबाईलचा अतिरेकी वापर टाळून अभ्यासासोबतच खेळाकडेही लक्ष द्यावे,'' असे आवाहन त्यांनी मनोगतातून केले. कार्यक्रमात अहिल्यानगर मनपा आरोग्य विभाग व जिजामाता आरोग्य केंद्र यांच्या वतीने 'अतिसारावर करूया मात, स्वच्छ ओआरएसची घेऊन साथ' या उपक्रमांतर्गत आरोग्य जनजागृती करण्यात आली. आरोग्य अधिकारी डॉ. आयेशा शेख यांनी अतिसार प्रतिबंधक उपाय, ओआरएस बनवण्याचे प्रात्यक्षिक, हात धुण्याचे योग्य तंत्र, डेंग्यूच्या अळ्या व गप्पी मासे यांचे प्रात्यक्षिक सादर करून विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेबाबत जागरुकता निर्माण केली. सकाळ एनआयई समूहाचे वितरण प्रमुख देविदास आंधळे व समन्वयक शिल्पा धोपावकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व एनआयई अंकांचे वाटप करण्यात आले. यावेळी शिल्पा धोपावकर यांनी एनआयई अंकाचे शैक्षणिक महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यक्रमास शिक्षण प्रशासनाधिकारी जुबेर पठाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप बागल, साथरोग अधिकारी सृष्टी बनसोडे, आरोग्य अधिकारी डॉ. आयेशा शेख, स्टाफ नर्स, परिचारिका, आशा व अंगणवाडी सेविका तसेच पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. मुख्याध्यापक विजय घिगे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर सूत्रसंचालन मनिषा शिंदे यांनी केले. भारती कवडे, मनीषा गिरमकर, वर्षा गायकवाड, विठ्ठल आठरे, मेघना गावडे, दीपाली नवले, शबनम खान यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यात नव्या स्वप्नांची सुरुवात- देशमुख

## डॉ. पाउलबुधे विद्यालयात नवगतांचे स्वागतासह पाठ्यपुस्तके वितरण



**अहमदनगर । विजय मते**

सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या वसंत टेकडी येथील डॉ. ना. ज. पाऊलबुधे विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे मनोभावे स्वागत करण्यात आले. याचप्रमाणे, इयत्ता पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचे वितरण करून शैक्षणिक वर्षाची सुरुवात आनंददायी आणि प्रेरणादायी करण्यात आली. या विशेष उपक्रमासाठी संस्थेचे सहसचिव रामकिसन देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात आली.

यावेळी संस्थेचे खजिनदार दादासाहेब भोईटे, विद्यालयाच्या प्राचार्या विजया नवले, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनिता सिद्दम, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शाळेच्या पहिल्याच दिवशी ३२५ विद्यार्थ्यांना वेळेत आणि सुव्यवस्थितरीत्या पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन शैक्षणिक वर्षासाठी विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी बोलताना रामकिसन देशमुख यांनी सांगितले की, ''विद्यार्थ्यांचे शिक्षण ही केवळ पुस्तकी ज्ञानाची प्रक्रिया नसून त्यांच्या सर्वांगीण विकासाचा पाया आहे.

शाळेचा पहिला दिवस हा त्यांच्या आयुष्यात नव्या स्वप्नांची सुरुवात असतो. याच दिवशी पुस्तकांचे वाटप होणे ही संस्था आणि शिक्षकवर्गाच्या कार्यतत्परतेचे प्रतीक आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे ही आमची सर्वोच्च जबाबदारी आहे.'' कार्यक्रमात दादासाहेब भोईटे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेचे सातत्यपूर्ण प्रयत्न असल्याचे सांगितले. ''बालवाडीपासून पदवीधर शिक्षणापर्यंत संपूर्ण शैक्षणिक संकुल एकाच परिसरात उपलब्ध करून दिले आहे. याचा लाभ हजारो विद्यार्थ्यांनी घेतला असून, ही आमच्या संस्थेच्या दृष्टीने गौरवाची बाब आहे,'' असे ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक परदेशी यांनी केले तर आभार प्रदर्शन विष्णू मगर यांनी केले. कार्यक्रमानंतर सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले.

त्यामुळे नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात गोड व संस्मरणीय ठरली. संपूर्ण परिसरात आनंददायी आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले. या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे यांनी विशेष कौतुक केले.



# गोजू रियो कैबुकाय कराटे बेल्ट ग्रेडिंग परीक्षा उत्साहात

## नवोदित कराटेपटूंचा सन्मान

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जपान कराटे-डो कैबुकाय इंडिया फेडरेशनच्या अंतर्गत दोन महत्त्वपूर्ण कराटे बेल्ट ग्रेडिंग परीक्षा नुकत्याच मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडल्या. या परीक्षांचे आयोजन प्रशिक्षक आणि परीक्षक सेन्साई अमित बडदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिहान तळेकर यांच्या सल्ल्याने करण्यात आले. ब्लॅक बेल्ट परीक्षा ता. ३० एप्रिल २०२५ रोजी देवबाग, मालवण येथे पार पडली, तर यापूर्वी कलर बेल्ट परीक्षा ता. ६ एप्रिल २०२५ रोजी शहरातील राघवेंद्र स्वामी मंदिर, बोल्हेगाव येथे घेण्यात आली. या दोन्ही कार्यक्रमांस प्रमुख पाहुणे म्हणून माजी सभापती कुमार वाकळे, चे प्राचार्य रवींद्र वरांगळे, पंकज वाकळे, अंबादास शिंदे, अरुणजी थिटे, सरपंच बापूसाहेब गोरे, सुरज खंडिझोड, अरुणोदय क्रीडा प्रतिष्ठानचे महेश आनंदकर, वैभव देशमुख व इतर मान्यवरांसह पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. पाहुण्यांनी आपल्या शुभेच्छा देताना सेन्साई अमित बडदे यांच्या अथक प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. परीक्षेत यश मिळवलेल्या कराटेपटूंना प्रमाणपत्र व बेल्ट प्रदान करून गौरवण्यात आले. बेल्ट प्राप्त कराटेपटू: ब्लॅक बेल्ट: सिद्धार्थ वाकळे, धनश्री अकोलकर, साक्षी थिटे, धनुष धिमते, स्वराज खरमाटे, शिवम देशमुख, वैष्णवी शिंदे, भूमिका कदम, साईनाथ थोरात, श्रुती जारकड, क्रांती बोरुडे, आरुष धिमते, सार्थक भोसले, साहिल राठोड, सारंग शिर्के, ऑफ व्हाईट बेल्ट: अनन्या गरजे, श्लोक बडदे, येलो बेल्ट: श्रद्धा वरांगळे, साई वरांगळे, मानस मित्रा, साक्षी वाघमारे, यश महाजन, आरव कांबळे, मानवी शिंदे, साईराज शिंदे, प्रथमेश जाधव, प्रणव जाधव, प्रणिती रायकर, श्लोक रायकर, ग्रीन बेल्ट: श्रुती भोसले, अर्णव रोहकले, सात्विक गुप्ता, पियुष तिजोरे, पवन गवते, अनुजा मानमोडे, ब्लू बेल्ट: सात्विक शिंदे, आयुष तिजोरे, पर्पल बेल्ट: प्रांजल पंधारे, ब्राऊन बेल्ट: सानवी गुप्ता, श्रावण जाधव या उपक्रमामुळे अहमदनगर जिल्ह्यातील कराटे क्रीडा क्षेत्राला अधिक बळ मिळाले असून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, शारीरिक शिस्त आणि सकारात्मक मानसिकता वृद्धिंगत झाली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पालक, प्रशिक्षक व आयोजक यांचे विशेष सहकार्य लाभले.

# अमेय बोरगे यांची नीटमध्ये उज्ज्वल कामगिरी

## देशात १०४० वा क्रमांक



**अहमदनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी अनिल बोरगे यांचे चिरंजीव अमेय बोरगे यांची २०२५ च्या परीक्षेत उज्ज्वल कामगिरी करत देशात १०४० व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले असल्यामुळे अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये त्यांच्या यशाचे कौतुक होत आहे. २०२५ परीक्षेत त्याने ७२० पैकी ५०८ गुण मिळवत, ९८.०१ टक्के मिळवले आहे. विद्यार्थ्यांनी मेहनतीने आणि सातत्याने प्रयत्न केले तर यश किती मोठं असू शकतं, याचं उत्तम उदाहरण ठरला आहे. अमेय बोरगे जेजे सायन्स अकॅडमीचा विद्यार्थी असून, त्याच्या या यशामुळे संपूर्ण नगर जिल्ह्यात नाव उज्वल झालय. वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात प्रवेश मिळवण्यासाठी घेतल्या जाणाऱ्या अत्यंत स्पर्धात्मक परीक्षांपैकी एक असलेल्या मध्ये अमेय बोरगे यांनी मिळवलेले यश म्हणजे त्याच्या कठोर अभ्यास, चिकाटी, व मेहनतीच्या जोरावर स्वप्नपूर्तीसाठी केलेल्या समर्पणाचे फलित आहे. या यशामागे त्याचे पालक डॉ.अनिल बोरगे व डॉ.सुरेखा बोरगे यांचे प्रोत्साहन, तसेच जेजे सायन्स अकॅडमीच्या शिक्षकांचे मार्गदर्शन आणि प्रयत्न देखील मोलाचे ठरले. त्याला भावी वैद्यकीय शिक्षणासाठी व पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्यात अमय बोरगे यांच्या यशामुळे अनेक नवोदीत विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळणार आहे.

# शिक्षक, पालकांच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थी घडतो- डोके



**अहमदनगर । प्रतिनिधी**

निर्मलनगर येथील लक्ष्मीबाई शांताराम डोके समाज विकास प्रतिष्ठान संचालित डोके विद्यालयात नवागत विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन मनोभावे स्वागत करण्यात आले. याचवेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके आणि शालेय साहित्याचे वितरण करून शैक्षणिक वर्षाची प्रेरणादायी सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बापूसाहेब डोके होते. यावेळी बोलताना ते म्हणाले, ''शाळा ही विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देणारी संस्था आहे. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेत, विद्यार्थी अभ्यासात प्रगती करावी. पालक आणि शिक्षकांच्या एकत्रित प्रयत्नातून विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडते. विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर केवळ अभ्यासापुरताच करावा.'' या कार्यक्रमास समन्वय समितीचे कारभारी गायकवाड, छबुराव ठोकळ, शोभा भालेराव, बाळू वाघुले, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे, संभाजी पवार, ज्योती पवार, सुजाता कर्डिले, मंजू नवगिरे, राणी राऊत, संजोत बर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. कारभारी गायकवाड यांनी सांगितले की, ''डोके विद्यालयामार्फत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमशीलतेने कार्य केले जात आहे. सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना दर्जेदार शिक्षण देत त्यांना सक्षम बनविण्याचा प्रयत्न सुरू आहे.'' मुख्याध्यापिका रिबेका क्षेत्रे म्हणाल्या, ''संस्थेच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना सर्वोतोपरी सुविधा दिल्या जात आहेत. शासनाच्या विविध योजना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविल्या जात आहेत. अभ्यासासोबतच विविध स्पर्धा आणि परीक्षा यासाठीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जात आहे.'' कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंदाकिनी पांडुळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन आशा धामणे यांनी मानले. शाळेच्या पहिल्याच दिवशी नवीन पाठ्यपुस्तके मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागाने परिसरात आनंदाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले होते.

# सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळेत गुलाबपुष्प देऊन विद्यार्थिनींचे स्वागत

**अहमदनगर । आबीद खान**

मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटी संचलित सावित्रीबाई फुले उर्दू कन्या शाळा, मुकुंदनगर येथे नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थिनींचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करून विद्यार्थ्यांनींना शिक्षणासाठी प्रेरित करण्यात आले.



या विशेष कार्यक्रमास मोहम्मदीया एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक व प्रमुख कार्यवाह प्रा. डॉ. अब्दुस सलाम, मखदूम सोसायटीचे अध्यक्ष आबीद दूल्हेखान, हसीब शेख, शाळेचे मुख्याध्यापक नौशाद सैय्यद, तसेच असलम पटेल, यास्मिन शेख, फरजाना शेख, शाहीन शेख, शेख सुलताना, शेख हीना, शेख उजमा आदी मान्यवर उपस्थित होते. शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांना वेळेत आणि सुयोग्यरीत्या पुस्तके पोहोचविण्यासाठी विशेष नियोजन केले होते. या उपक्रमामुळे विद्यार्थी आणि पालक वर्गामध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रा. डॉ. अब्दुस सलाम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासातील शिस्त, नियमितता आणि वेळेचे महत्त्व पटवून दिले. तसेच, पालकांनी शाळेतील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. या उपक्रमाचे मुख्याध्यापक नौशाद सैय्यद आणि त्यांच्या शिक्षकवर्गाने घेतलेल्या मेहनतीचे पालकांनी विशेष कौतुक केले. शाळेच्या नव्या शैक्षणिक वर्षाची अशी सकारात्मक आणि आनंददायी सुरुवात होत असल्यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक

भाड्याने देणे
परिचय हॉटेलजवळ, बालिकाश्रम रोडवर कॉर्पोरेट ऑफिस, बँक, शोरूम, क्लिनिक आदींसाठी ८०० स्क्वेअर फुटाचे दोन मजले बांधलेली जागा भाड्याने देणे आहे.
- संपर्क -
८८८८३४७४११

निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.


मे. रुपाली एजन्सी
फुड प्रॉडक्ट मटेरियल सप्लायर्स
राधिका लॉजजवळ, तापकीर लेन, आडत बाजार, अहमदनगर - ४१४००१.
(०२४१) २३४३०६०, ९८२२८४३०६०
ई-मेल - rupaliagency@gmail.com

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

रयत समाचार


# नागवडे स्कूलमध्ये फादर्स डे उत्साहात साजरा

## पालकांनी अनुभवला रस्सीखेच, संगीत खुर्ची खेळांचा आनंद



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठान संचलित शिवाजीराव नागवडे इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये 'फादर्स डे' अर्थात पितृदिन मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते आणि त्यांनी विविध उपक्रमांमध्ये सहभागी होत आनंद लुटला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विष्णू गायकवाड होते. विशेष अतिथी म्हणून सेंट्रल बँकेचे मॅनेजर सागर गोडसे, ज्येष्ठ मानसतज्ज्ञ विजयकुमार कारळे, समीर बोरा, तुळजाभवानी सेवा प्रतिष्ठानचे निरीक्षक एस. पी. गोलांडे आणि सोनिया गांधी पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमोल नागवडे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमात विद्यार्थिनी स्पृहा काळेवाघ आणि सिद्धी लिमकर यांनी भावस्पर्शी मनोगत व्यक्त केले. तसेच पालक प्रतिनिधी म्हणून प्रा. विक्रम शिंदे, रुपेश इथापे, समीर बोरा, प्रकाश कापसे यांनी 'फादर्स डे'सारख्या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक करत शालेय प्रशासनाचे अभिनंदन केले. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी सादर केलेल्या 'घडीभर तू थांब जरा' या गीताने उपस्थितांच्या डोळ्यांच्या कडा ओलावल्या, तर I Love You Daddy या गीतावरील नृत्य सादरीकरणाने वडील-मुलांच्या नात्यातील भावनिक नाते अधोरेखित केले. यावेळी पालकांसाठी रस्सीखेच, संगीत खुर्ची यासारख्या खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत मुलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण केले. वडिलांना खेळताना पाहून विद्यार्थ्यांनीही जल्लोषात आनंद साजरा केला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रेया खेतमाळीस, आकांक्षा रोडे आणि अर्पिता शिंदे यांनी केले, तर जयेश आनंदकर यांनी आभार प्रदर्शन केले.



# आता सहनशक्ती संपली महिलांचा दारूबंदीसाठी पुढाकार

## कृपया गाव वाचवा; महिलांचा पोलिस निरीक्षकांपुढे आक्रोश

**पाथर्डी । प्रतिनिधी**

तालुक्यातील हनुमान टाकळी गावातील महिलांनी गावात सुरू असलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात तीव्र आवाज उठवत पोलिस ठाण्यात धडक दिली. नुकतेच रुजू झालेले पाथर्डी पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्यासमोर महिलांनी आपल्या व्यथा मांडत दारू दुकाने बंद करण्याची मागणी केली.

महिलांनी यावेळी सांगितले की, ''गावातील जवळपास सर्वच पुरुष दारूच्या आहारी गेले आहेत. तरुणांबरोबरच लहान मुलेही दारू पिताना दिसत आहेत. व्यसनाधीन झालेल्या नवऱ्यांकडून रोज सायंकाळी महिलांवर जनावरांप्रमाणे मारहाण होते. माराच्या भीतीने अनेक महिलांना घराबाहेर झोपावे लागते.'' ''आम्ही दिवसभर कष्ट करून घर चालवत असतो. मात्र दारूला पैसे दिले नाहीत तर नवऱ्यांकडून मारहाण होते. बापाचं पाहून मुलंही दारू पिऊ लागली आहेत. काही पुरुषांनी तर दारूसाठी घरातील भांडी, जनावरे, इलेक्ट्रिक मोटारसुद्धा विकली आहे. विकलेल्या वस्तू दुप्पट किंमतीला आम्हालाच परत घ्याव्या लागतात,'' असा संताप व्यक्त करत महिलांच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते.

याप्रसंगी महिलांनी दारू विक्रेत्यांना पोलीस यंत्रणेचा भीती राहिलेली नाही असे स्पष्टपणे सांगितले. ''दिवस मावळल्यावर तरुण मुलींनाही गावात फिरणे कठीण झाले आहे. रात्री घराघरांत भांडणे सुरू असतात. दारूपायी अनेकांचे संसार उध्वस्त झाले आहेत. विक्रेते मुलांना व पुरुषांना उधारीवर दारू देतात आणि त्यानंतर त्या पैशांसाठी महिलांकडे तगादा लावतात,'' अशीही माहिती महिलांनी दिली. महिलांनी याआधीही यासंदर्भात लेखी तक्रारी दिल्या होत्या, मात्र कोणतीही कारवाई झालेली नाही, असेही त्यांनी निदर्शनास आणले. ''आमचं जगणं आता नकोसं झालंय. साहेब, कृपया लक्ष घाला आणि गावातील दारू बंद करा. आम्हाला न्याय द्या,'' असे म्हणत अनेक महिला अश्रू ढाळत पोलिस निरीक्षकांसमोर कैफियत मांडत होत्या. या आंदोलनाचे नेतृत्व राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट)महिला अध्यक्षा मनीषा डांभे यांनी केले. त्यांनी पोलीस निरीक्षक पुजारी यांना निवेदन देत गावात त्वरित दारूबंदी लागू करण्याची मागणी केली. या वेळी उपस्थित महिलांमध्ये अलका गायकर, शोभा आंधळे, सविता गायकवाड, चंद्रकला बर्डे, नंदा दगडखैर, राहीबाई दगडखैर, सुनिता उदार, गयाबाई बर्डे, भामा बर्डे, हिराबाई बर्डे, रंजना बर्डे, सीता दगडखैर, रुक्मिणी दगडखैर, इंदुबाई बावणे, वैशाली शेळके, सुनीता राजळे, रेणुका शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ महिला उपस्थित होत्या.



# सामाजिक उपक्रमांनी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांचा वाढदिवस साजरा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री व जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगावमध्ये विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अरुणभाऊ मुंढे यांच्या पुढाकारातून उचल फाउंडेशन, शेवगाव मार्फत येथील अनाथ, निराधार व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच शेवगावमधील आखेगाव रोड येथे वृक्षारोपणाचा उपक्रम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांद्वारे नामदार विखे पाटील यांचा वाढदिवस समाजोपयोगी कार्यातून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमावेळी भाजपाचे दिगंबर काथवटे, अंकुश अण्णा कुसळकर, पप्पू दादा केदार, सोमनाथ शिंदे, सागर जाधव, अभय पालवे, कानीफ साखरे, ऋतिक भाडाइत, योगेश जाधव, सचिन जाधव, अनिरुद्ध मुंढे, अभी बडे, प्रणव खरात, आदित्य नागरगोजे, अमित सुपारे आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदर्शगाव हिवरेबाजार शाळेत नवागतांचे स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

आदर्शगांव हिवरेबाजार जि.प.प्राथमिक शाळा आणि यशवंत माध्यमिक विद्यालय या शाळेत सोमवारी ता.१६ रोजी शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत करण्यात आले. यानिमित्त शाळेत इयत्ता पहिली, पाचवी, आठवी आणि इतर वर्गात प्रथमच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पहिलीत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि रंगीबेरंगी फुगे देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक ठाणगे, प्रास्ताविक विजय ठाणगे यांनी केले. उपस्थित विद्यार्थ्यांना शालेय मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले तसेच पाटी पेन्सिल, पट्टी, अंकलिपी, आणि गोड जेवणही देण्यात आले. यावेळी बोलताना पद्मश्री डॉ. पोपट पवार म्हणाले, नवागतांना शाळेची भीती वाटते आणि कुतुहलही वाटते. यावेळी पवार यांनी पूर्वीचे शाळेचे अनुभव कथन केले, पूर्वी शाळांना शेणाने सारवले जायचे, पूर्वी दहावीपर्यंत शाळेत जातांना चप्पल, फुल पॅन्ट नसायची, अकरावीला गेल्यावर स्लीपर आणि फुल पॅन्ट मिळायची तसेच मुलांना हरिपाठ, वृक्षारोपण, सहल, खेळ इ. विषयांचे मार्गदर्शन केले, तर व्यसन आणि मोबाईल पासून दूर राहण्यास सांगितले.



चांगले संस्कार, चांगला आहार, वैयक्तिक स्वच्छता, पैशांची बचत इत्यादी नाविण्यपूर्ण बाबींचे मुलांना मार्गदर्शन केले. यावेळी नगरचे तहसीलदार राजेंद्र शिंदे, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समितीचे वसंत बिनवडे व सर्व स्टाफ, सरपंच विमलताई ठाणगे, अध्यक्ष अर्चना ठाणगे, सहदेव पवार, एस.टी पादीर, रो. ना. पादीर, दत्तात्रय ठाणगे, पालक, ग्रामस्थ व सर्व शिक्षक उपस्थित होते.

# एआय, डेटा सायन्स व ॲनालिटिकल केमिस्ट्री अभ्यासक्रमांना शासनाची अंतिम मान्यता

**कोपरगाव । किसन पवार**

येथील के. जे. सोमैया (वरिष्ठ) आणि के. बी. रोहमारे (कनिष्ठ) महाविद्यालयात सुरु होणाऱ्या बी.एस्सी. आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग, बी.एस्सी. डेटा सायन्स तसेच एम.एस्सी. ॲनालिटिकल केमिस्ट्री या आधुनिक व रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांना महाराष्ट्र शासनाची अंतिम मान्यता मिळाली आहे. ही माहिती संस्थेचे प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांनी दिली. डॉ. ठाणगे म्हणाले की, ''सदर अभ्यासक्रम तीन वर्षांचे असून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरच्या शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने हे कोर्सेस सुरु करण्यात येत आहेत. यासाठी संस्थेने अद्ययावत 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' प्रयोगशाळा उभारली असून अत्यंत माफक शुल्कात विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी उपलब्ध करून दिली आहे.'' या अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांना देश-विदेशातील




नामांकित कंपन्यांमध्ये नोकरीच्या उत्तम संधी उपलब्ध होणार असून, आयटी, बँकिंग, उद्योग, शेती, वैद्यकीय क्षेत्रात ए.आय. व डेटा सायन्सचा झपाट्याने होणारा वापर लक्षात घेता हे अभ्यासक्रम भविष्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत, असेही त्यांनी नमूद केले. या ऐतिहासिक निर्णयाबाबत संस्थेचे अध्यक्ष अशोक रोहमारे, सचिव ॲड. संजीव कुलकर्णी आणि विश्वस्त संदीप रोहमारे यांनी समाधान व्यक्त केले असून, ग्रामीण विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व तंत्रज्ञानाधिष्ठित शिक्षणाच्या माध्यमातून नव्या संधी देण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमांतर्गत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**अहमदनगर । प्रतिनिधी**

शाळा प्रवेशोत्सव २०२५ कार्यक्रमांतर्गत जिल्हाभरातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन मोठ्या उत्साहाच्या वातावरणात स्वागत केले. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना समग्र शिक्षाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, बुट, पायमोजे आदींचे वितरणही करण्यात आले. शाळेच्या पहिल्याच दिवशी मान्यवरांनी केलेल्या स्वागताने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसत होता.




जिल्हा परिषदेच्या शाळेत दाखलपात्र ५९ हजार ५२७ विद्यार्थ्यांपैकी ३५ हजार ३०९ विद्यार्थी तर इतर व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये १९ हजार २१७ शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थी दाखल झाले. सनदी अधिकाऱ्यांनी केले विद्यार्थ्यांचे स्वागत जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांनी अहिल्यानगर तालुक्यातील निंबोडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. यावेळी डॉ. आशिया यांच्या हस्ते इन्फोसिस स्प्रीनबोर्ड- मेकर लॅब ऑन व्हील्स या उपक्रमाचा शुभारंभही करण्यात आला. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी भोरवाडी येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले तर जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी बुऱ्हाणनगर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी राहाता येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. हंगा येथील शाळेमध्ये खासदार निलेश लंके यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शेवगाव तालुक्यातील वरुर येथील शाळेत आमदार मोनीका राजळे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार किरण लहामटे यांनी अकोले तालुक्यातील कातळापूर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार हेमंत ओगले यांनी श्रीरामपूर व राहूरी येथील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार विठ्ठलराव लंघे यांनी नेवासा तालुक्यातील गेवराई येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार काशिनाथ दाते यांनी टाकळी ढोकेश्वर ता. पारनेर येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. आमदार विक्रम पाचपूते यांनी श्रीगोंदा येथील शाळेमध्ये विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शाळा प्रवेशोत्सवप्रसंगी जिल्हा परिषदेचे सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व विभागांचे विभागप्रमुख, तालुकास्तरावरील तहसिलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी यांच्यासह जिल्ह्यातील वर्ग-१ व वर्ग-२ अधिकाऱ्यांनी ३०४ शाळांना भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. नवागतांच्या स्वागतासाठी रांगोळी, वर्ग सजावट करण्यात आली होती. गावा-गावातून प्रभातफेऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. पहिले पाऊल उपक्रमांतर्ग इयत्ता १ लीच्या विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे घेऊन पालकांना त्यांची प्रतही देण्यात आली. लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी समारंभपूर्वक केलेल्या स्वागतामुळे सर्व विद्यार्थी आणि पालक भारावून गेले होते. या स्वागतामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधानाचे भाव स्पष्ट दिसत होते.



**नगर तालुक्यातील पिंपळगाव माळवी पंचक्रोशीतील रस्त्याच्या दुतर्फा मागील दोन वर्षापासून जलजीवन मिशनचे पाईपलाईनचे अर्धवट काम व बेवारस पाईप. प्रशासन व पदाधिकाऱ्यांचे दुर्लक्ष. (छायाचित्र- खासेराव साबळे)**

# जलसंधारण प्रत्येकाचे कर्तव्य

भारतीय हवामान खात्याने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होईल असा अंदाज वर्तवला आहे. यावर्षी पाऊस लवकर येईल असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता तो खरा ठरताना दिसत आहे. ७ जूनला महाराष्ट्रात दाखल होणारा मान्सून यावर्षी २५ मे रोजीच दाखल झाला आहे. पाऊस लवकर आल्याने बळीराजाची चिंता दूर झाली आहे. पाऊस लांबला की पेरण्या लांबतात आणि पेरण्या लांबल्या की बळीराजाचे पुढील सर्व नियोजन कोलमडते. सुदैवाने राज्यात वेळेवर पाऊस सुरू झाल्याने राज्यातील अनेक भागात होणारी पाणीटंचाई मिटली आहे. सध्या राज्यात सर्वदूर पावसाने हजेरी लावली आहे. विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्रासह मराठवाड्यातही दमदार पाऊस कोसळत आहे. मान्सूनपूर्व पावसानेही राज्यात चांगलाच धुमाकूळ घातला होता. आताही राज्यात दमदार पाऊस पडत आहे. राज्यात दमदार पाऊस पडत असल्याने धरणातील पाणी साठाही वाढत आहे. उजनी सारखे मोठे धरण आताच ४० टक्के भरले आहे.



राज्यातील सर्व नद्या,नाले, तलाव, ओढे ओसंडून वाहत आहेत. वरुण राजाने यावेळी चांगलीच कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. धरणीमाईही चिंब भिजून हिरवा शालू पांघरत आहे. गेल्या काही वर्षात राज्यात अपुरा पाऊस पडल्यामुळे दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात पाण्याची मोठी टंचाई निर्माण झाली होती. हंडाभर पाण्यासाठी नागरिकांना कैक किलोमीटरची पायपीट करावी लागत होती. पाण्यासाठी दाही दिशा.... अशी लोकांची अवस्था झाली होती. सुदैवाने यावर्षी सरासरीपेक्षा जास्त पाऊस होणार असल्याने पाणी टंचाई मिटली आहे असे असले तरी पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. यावर्षी पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन आणि वापर करावा लागणार आहे. यावर्षी सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडणार असल्याने पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यावी लागणार आहे. पावसाच्या जास्तीतजास्त पाण्याची बचत कशी होईल याचे नियोजन आतापासूनच करावे लागणार आहे. जमिनीवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्यामुळे बरेचसे पाणी वाया जाते. कमी पाऊस पडणाऱ्या भागात तर हा पाण्याचा अपव्यय होय. महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी जिरवणे आणि पाणी साठवणे या दोन तंत्राची खूप जरुरी आहे. पाणी साठवण्यापेक्षा पाणी जिरवण्याचा फायदा असा की भूगर्भातील पाण्याचे बाष्पीभवन होत नाही व त्यात घट होत नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ धरणे बांधून, पाईपलाईन शहरापर्यंत नेऊन घरोघरी पाणी पोहचवणे असा नाही. जलव्यवस्थापन याचा अर्थ समाज व पाणी यांच्यातील संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणे. त्यासाठी पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे महत्व पटवून देणे.

पावसाचे पाणी वाया जाऊ नये यासाठी पाण्याचे व्यवस्थापन कसे करावे याचे शाळा, कॉलेजमधील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला हवे. यासंदर्भात नागरिकांचेही प्रबोधन व्हायला हवे. नदी, विहीर, तलाव, बंधारे यात पावसाचे जास्तीतजास्त पाणी कसे साठेल याचे नियोजन सरकारी पातळीवर व्हायला हवे. नागरिकांनी आपल्या घरात, सोसायटीत रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. शाळा, कॉलेज तसेच सरकारी कार्यालयातही रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीम बसवावी. पावसाच्या पाण्याची साठवणूक म्हणजे पर्जन्य जलसंधारण प्रत्येक घरात, सोसायटीत, कार्यालयात झाले पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत पावसाचे पाणी वाया जाणार नाही याची दक्षता घ्यायला हवी. पाण्याचा थेंब न थेंब महत्वाचा आहे. कारण पाण्याची बचत हीच पाण्याची निर्मिती आहे. पाण्याची बचत करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे कारण ती काळाची गरज आहे. भविष्यात दुष्काळ पडू नये असे वाटत असेल तर पर्जन्य जलसंधारण करावेच लागेल.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# पावसाच्या साक्षीने साजरा झाला कवितांचा उत्सव



## १६ वे कविसंमेलन दादर येथे उत्साहात संपन्न

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**


दादरच्या राजा शिवाजी विद्या संकुल येथे १५ जून २०२५ रोजी ''मराठी साहित्य व कला सेवा'' आणि ''शोध आनंदाचा फाऊंडेशन'' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १६वे कविसंमेलन भारावलेल्या वातावरणात, अत्यंत रसाळ आणि भावस्पर्शी स्वरूपात संपन्न झाले. या कविसंमेलनाचे नेमके, प्रवाही आणि रसिकांशी संवाद साधणारे सूत्रसंचालन प्रभावी शैलीत विक्रांत लाळे यांनी केले. प्रत्येक कवीच्या सादरीकरणापूर्वी केलेली ओळख, विषयाची पार्श्वभूमी आणि रसिकांची संवेदना जागवणारे शब्द यामुळे संपूर्ण संमेलनात सातत्य आणि ओघ निर्माण झाला. कार्यक्रमाचे आयोजन तीन विशेष सत्रांमध्ये करण्यात आले होते पाऊस, जागतिक पितृदिनानिमित्त 'बाबा' आणि मुक्त विषय. या तिन्ही सत्रांमध्ये सहभागी कवींसोबत रसिकांनीही शब्दांच्या सरींत चिंब भिजण्याचा आनंद लुटला. विशेष म्हणजे ''पाऊस'' या सत्रात कविता सादर होत असतानाच खऱ्याखुऱ्या पावसाने आपली साक्ष देत उपस्थित राहून काव्याचे आभाळच भरून टाकले. कार्यक्रम संपेपर्यंत थोडी विश्रांती घेतलेल्या या आभाळरुपी श्रोत्याने, सारे कवी-रसिक सुखरूप घरी पोहोचल्यावरच आपल्या थेंबांच्या टाळ्यांनी कवितांना सलामी दिली! मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर येथून आणि पुण्याहूनही विशेष कवी उपस्थित होते, ज्यांनी आपल्या शब्दांनी संमेलनात नवीन सूर मिसळले. डॉ. मानसी पाटील, प्रा. स्नेहा केसरकर, अशोक दामोदर कुलकर्णी (पुणे), कल्पना दिलीप मापूसकर, कल्पना निलेश सांगळे, किशोरी शंकर पाटील, जयश्री हेमचंद्र चुरी, एकनाथ शेडगे, सरोज लट्टू, स्मिता शाम तोरसकर, आश्विनी सोपान म्हात्रे, संतोष धर्मराज मोहिते, अशोक (भाई) पुंडलीक नार्वेकर, विक्रांत मारूती लाळे, शितलादेवी सुनिल कुळकर्णी, रविंद्र शंकर पाटील, सुचित्रा अरुण टिपणीस या सर्व कवींनी आपल्या शैलीतून भावना उलगडत रसिकांशी संवाद साधला. विशेष उल्लेखनीय म्हणजे नितीन सुखदरे आणि सनी आडेकर यांनी त्यांच्या मनातील ''बाबा'' सर्वांसमोर प्रभावीपणे सादर करून कार्यक्रमात भावनिक रंग भरले. कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी श्री. लट्टू, शैलेश नाबर आणि बालकवी वेदान्त यशवंत पंडित उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी साहित्य कला सेवाचे संस्थापक अध्यक्ष गुरुदत्त वाकदेकर, शोध आनंदाचा फाऊंडेशनचे अध्यक्ष नितीन सुखदरे, सचिव सनी आडेकर, तसेच विक्रांत लाळे, रविंद्र पाटील आणि किरण जाधव यांनी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या एकत्रित नियोजनामुळे हे कविसंमेलन केवळ एक कविसंमेलन न राहता, एक भावपूर्ण आणि संस्मरणीय अनुभव ठरला. त्यांच्या नेतृत्वामुळे संमेलनाला एक सुसंस्कृत, समर्पित आणि सर्जनशील चौकट लाभली. साहित्यसेवेचा व संवेदनशील दृष्टिकोनाचा प्रभाव संमेलनाच्या प्रत्येक टप्प्यावर अनुभवायला मिळाला. साहित्यप्रेमींसाठी आनंदाची बातमी अशी की, १७वे कविसंमेलन येत्या १३ जुलै २०२५ रोजी दादर येथेच होणार आहे. काव्यरसिकांनी आपल्या दिनदर्शिकेत ही तारीख नोंद करून, पुन्हा एकदा या शब्दोत्सवात सामील होण्याची संधी गमावू नये!

# प्रतिकूलतेवर मात करत गायकवाडचा यशस्वी प्रवास



**श्रीरामपूर । शफीक बागवान**

टाकळीभान गावातील शिवम गायकवाड या युवकाने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण करून राज्य उत्पादन शुल्क विभागात जिल्हा उपअधीक्षक पद मिळवले आहे. मातृ-पितृछत्र हरपलेल्या या युवकाच्या यशाचा गौरव करण्यासाठी गावकऱ्यांकडून ग्रामपंचायत कार्यालयातील स्व. गोविंदराव आदिक सभागृहात भव्य नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात माजी सभापती नानासाहेब पवार यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, ''शिवमचा आदर्श अजरामर आहे. आज अनेक तरुणांना सर्व सुविधा असूनही यश मिळवणे कठीण जाते. मात्र शिवमने जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक विचारसरणीच्या बळावर हे यश मिळवले.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ ग्रामस्थ श्रीधर गाडे होते. शिवमच्या या प्रवासात त्याचे मावशी काका खंडेराव व नंदा गवांदे यांचे मोलाचे योगदान असल्याचे पवार यांनी नमूद केले. भावूक होत खंडेराव गवांदे सरांनी शिवमच्या परिश्रमांबद्दल गौरवोद्गार काढले. शिवमच्या यशामुळे संपूर्ण गवांदे कुटुंबीय आणि ग्रामस्थ गहिवरले होते. कार्यक्रमात माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, प्रा. कार्लस साठे, प्राचार्य जयकर मगर, प्रा. खंडेराव गवांदे, प्राचार्य शिंदे, डॉ. विकास नवले आदी मान्यवरांनी शिवमला शुभेच्छा देत त्याच्या यशाचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्जुन राऊत यांनी केले, तर आभार प्रदर्शन अनिल बोडखे यांनी मानले.



# श्री आनंद जैन विद्यालयाच्या नूतन प्राचार्यपदी डी.सी. फकीर

**पाथर्डी । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित व शतकोत्तर वाटचाल करणाऱ्या श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाच्या चिंचोडी येथील श्री आनंद जैन विद्यालयाच्या नूतन प्राचार्यपदी डी. सी. फकीर यांची पदोन्नतीने नियुक्ती करण्यात आली आहे. ते अगोदर पाथर्डी येथील श्री तिलोक जैन विद्यालयात पर्यवेक्षक पदावर कार्यरत होते.

शैक्षणिक क्षेत्रात प्राचार्य फकीर यांनी अतिशय अभ्यासु, विद्यार्थीप्रिय व कडक शिस्तीचे शिक्षक म्हणून कामगिरी बजावली असून त्याची दखल घेऊन त्यांना ही जबाबदारी देण्यात आली. डी. सी. फकीर यांनी श्री तिलोक संस्थेत आल्यानंतर विवीध विषय व पदाची जबाबदारी समर्थपणे संभाळली. त्यांचे शिक्षणक्षेत्रात मोठे योगदान आहे.

या नियुक्तीचा पदग्रहण समारंभ प्रसंगी श्री तिलोक जैन ज्ञान प्रसारक मंडळाचे चिचोंडी येथील संस्थेचे कार्यकारिणी सदस्य चुनिलालजी गुगळे यांनी त्यांचा सन्मान करत स्वागत केले. यावेळी विद्यालयाचे माजी प्राचार्य विजयकुमार छाजेड व इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्री छाजेड यांनी त्यांच्याकडे पदभार सोपवला. यानिमित्त संस्थेचे सचिव सतीश गुगळे, खजिनदार सुरेश कुचेरिया, विश्वस्त डॉ.ललित गुगळे, राजेंद्र मुथ्था, धरमचंद गुगळे, कार्यकारी मंडळाचे सदस्य डॉ. अभय भंडारी, डॉ.सचिन गांधी, चांदमल देसर्डा आदींनी प्राचार्य फकीर यांना भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# किरण पालवे राष्ट्रवादी कामगार आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी

**पाथर्डी । प्रतिनिधी**

मनसे रोजगार व उद्योग विभागाचे जिल्हाध्यक्ष असलेले किरण पालवे यांनी काही दिवसांपूर्वीच राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला होता. अजित पवार यांनी पक्ष प्रवेशाच्या वेळी न्याय देण्यात येईल असा शब्द दिला होता. त्याप्रमाणे नुकत्याच शिवछत्रपती क्रिडा संकुल बालेवाडी पुणे येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा २६ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात किरण पालवे यांची आमदार शिवाजीराव गर्जे यांच्या शिफारशीनुसार पक्षाच्या कामगार आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. या निवडीचे पत्र कामगार आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मनोज व्यवहारे यांनी वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात किरण पालवे यांना दिले.

किरण पालवे मागील अनेक वर्षापासून राजकीय व सामाजिक कार्यात अग्रेसर असून सक्रियपणे काम करत आहेत.



त्यांना कोणतीही राजकीय पार्श्वभुमी नसताना एका सैनिक कुटुंबातून येवून स्वताहाच्या कार्याच्या जोरावर आपली वेगळी ओळख निर्माण करून किरण पालवे यांनी आजपर्यंत गाव, तालुका व जिल्हा पातळीवर लोकहीतासाठी अनेक आंदोलने, मोर्चे यांच्या माध्यामातून शेतकरी, कष्टकरी, युवक, महिला, कामगार अशा सर्वच घटकांसाठी मोठा संघर्ष उभा केला. त्यातूनच युवकांची मोठी फळी त्यांनी तालुक्यात व शहरात निर्माण केली असून आज अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करून हा लोकहीताचा संघर्ष असाच सुरू ठेवण्यार असल्याचे पालवे यांनी सांगीतले. आमदार शिवाजीराव गर्जे, मा.आ.चंद्रशेखर घुले, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत व उपाध्यक्ष अंकुशराव गर्जे, तालुकाध्यक्ष रणजीत बेळगे यांनी पालवे यांचे अभिनंदन केले.

# ३० जूनला जनसुरक्षा विधेयक विरोधात मुंबईत विराट मोर्चा

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांची माहिती

**मुंबई । प्रतिनिधी**

'महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४' हे घटनाविरोधी, लोकशाही मूल्यांना बाधा आणणारे आणि जनतेच्या मूलभूत हक्कांची गळचेपी करणारे असल्याचा आरोप करत डाव्या आणि लोकशाहीवादी पक्ष-संघटनांनी जोरदार आंदोलनाची हाक दिली आहे. ३० जून रोजी मुंबईत विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी विराट मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सचिव ॲड. सुभाष लांडे यांनी दिली. 'जनसुरक्षा विधेयक विरोधी समिती'च्या नेतृत्वाखाली भाकप, माकप, शेकाप, माले, समाजवादी पक्ष, सकप, लाल निशाण पक्ष यांसह अनेक संघटना एकत्र येऊन व्यापक जनआंदोलन उभे करत आहेत. याअंतर्गत राज्यभरात विभागीय मेळावे, तहसील व जिल्हाधिकारी कार्यालयांवर निदर्शने, आमदारांच्या कार्यालयांवर धडक मोहिमा राबवण्यात येणार आहेत. सदर विधेयकावर आजपर्यंत राज्यभरातून तब्बल १२,००० पेक्षा अधिक हरकती व सूचना प्राप्त झाल्या आहेत. एवढ्या प्रमाणात हरकती येण्याचे हे राज्यात पहिलेच उदाहरण आहे. मात्र, विधीमंडळाच्या संयुक्त समितीने कोणालाही प्रत्यक्ष म्हणणे मांडण्याची संधी दिली नाही, हे लोकशाही प्रक्रियेचे उल्लंघन असल्याचे समितीचे म्हणणे आहे. हे विधेयक लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि आंदोलनाच्या अधिकारावर आघात करते. ''बेकायदेशीर कृत्य'' व ''बेकायदेशीर संघटना'' यांची व्याख्या अतीव खुली आणि गोंधळात टाकणारी आहे, ज्याचा गैरवापर शक्य आहे. कोणत्याही व्यक्तीवर 'संशय' आल्यास त्याच्यावर कठोर कारवाई करता येईल, हे अत्यंत धोकादायक आहे. सरकारविरोधात भूमिका घेतलेल्या संघटना व कार्यकर्त्यांवर अन्यायकारक दबाव आणण्यासाठी हा कायदा वापरला जाऊ शकतो. 'अर्बन नक्षल' अस्पष्ट व्याख्या, गंभीर दुरुपयोग विधेयकात 'अर्बन नक्षलवाद' रोखण्यासाठी तरतुदी केल्या असल्या तरी 'अर्बन नक्षल' म्हणजे काय? याची स्पष्ट व्याख्या न दिल्याने या संज्ञेचा उपयोग विरोधकांना दडपण्यासाठी केला जाईल, अशी भीती व्यक्त करण्यात आली आहे. या कायद्याची तुलना थेट १९२८ मधील ब्रिटिश सरकारच्या दडपशाही कायद्याशी करण्यात आली आहे, ज्याविरोधात भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी असेम्ब्लीमध्ये बॉम्ब टाकून आवाज उठवला होता. ३० जूनचा विराट मोर्चा ठरणार निर्णायक! विधानभवनाला घेराव घालून हे विधेयक त्वरित रद्द करण्याची मागणी जोरदारपणे मांडली जाणार आहे. जनतेला या विधेयकाची वस्तुस्थिती समजावी आणि लोकशाहीचा आवाज बुलंद व्हावा यासाठी सर्वसामान्यांनी या लढ्यात सामील व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

